पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ३३२ दिनांक - ०६/०५/२०२३**

**येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर**

# येरवडा पोलीस कडून नशाकारक,गुंगीकारक औषधी गोळया जप्त

दि.०५/०५/२०२३ रोजी पोलीस अंमलदार अमजद शेख व अनिल शिंदे यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक इसम हा राजीव गांधी परिसरात मानवी मनावर परिणाम करणा-या नशाकारक, गुंगीकारक औषधी गोळयांची अवैध्यरित्या विक्री करीत आहे.

सदरची बातमी पोलीस उप निरीक्षक अंकुश डोंबाळे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना कळविले असता वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली राजीव गांधीनगर येरवडा येथे पो.उप.निरी. अंकुश डोंबाळे,पोलीस अंमलदार अमजद शेख, अनिल शिंदे हे सापळा रचून थांबलेले असताना एक संशयीत काळे रंगाची पिशवीसह मिळून आल्याने त्याला जागीच पकडले असता त्याने आपले नाव **असिफ अकबर शेख वय १९ रा गल्लीनं ७ राजीव गांधीनगर येरवडा पुणे** असल्याचे सांगितले. त्याचे अंगझडतीत एक काळे रंगाचे पिशवीमध्ये २२००/- रु.कि.च्या २२ स्ट्रीप्स नशाकारक, गुंगीकारक औषधी गोळया मिळून आल्या आहेत.

सदर बाबत येरवडा पो स्टे गु र नं २९५/२०२३ भादवि ३२८ २७६ एनडीपीएस कलम २२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे.सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक अशोक काटे करत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-४,श्री.शशिकांत बोराटे,मा.सहा. पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,श्री किशोर जाधव,वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन श्री बाळकृष्ण कदम,पोलीस निरीक्षक (गुन्हे) येरवडा पोलीस स्टेशन श्री.जयदिप गायकवाड,यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप-निरीक्षक अंकुश डोंबाळे, पोलीस अंमलदार गणपत थिकोळे,दत्ता शिंदे, तुषार खराडे, अमजद शेख, किरण घुटे, सागर जगदाळे, कैलास डुकरे, प्रविण खाटमोडे, अनिल शिंदे, सुरज ओंबासे, प्रशांत कांबळे, अश्विन देठे यांनी केलेली आहे.